**-: जाहीरनामा :-**

**अर्जदार** : - १. श्रीम. माधुरी शक्तीसिंह शिंदे
२. ओम शक्तीसिंह शिंदे अ.पा.क.आई-
श्रीम. माधुरी शक्तीसिंह शिंदे

अर्जदार नं. ०१ ह्या मयत कै श्रीम. शशिकला राजन शिंदे यांच्या सुन असुन अर्जदार नं. ०२ हा नातु आहे. कै. श्रीम. शशिकला राजन शिंदे ह्या दिनांक २३/१२/२०१९ इ रोजी मयत झालेल्या असुन त्यांचा मुलगा कै. शक्तीसिंह राजन शिंदे हे दिनांक ३०/०६/२०२१ इ. रोजी मयत झालेले आहेत. त्यांना अर्जदार नं. ०१ व ०२ हे कायदेशीर सरळ वारस आहेत. मयत कै. श्रीम. शशिकला राजन शिंदे ह्या जिल्हा परिषद , कोल्हापूर - आरोग्य विभागांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र , भादोले ता. हातकणंगले जि. कोल्हापूर येथे कायमस्वरुपी सेवेत होत्या, सेवेत असतानाच दिनांक २३/१२/२०१९ रोजी राहते घरी मयत झालेल्या आहेत.अर्जदार यांनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क स्तर कोल्हापूर यांचेकडील वारस दाखला सादर केले आहे. वारस नं. ०१ व ०२ यांनी कै. श्रीम. शशिकला राजन शिंदे यांचे नावे जिल्हा परिषद कोल्हापूर यांचेकडे सेवानिवृत्त नंतरचे लाभ विषयक जमा असलेली रक्कम मिळणे कामी मागणी केलेली आहे.

त्याअर्थी या जाहीरनाम्याद्वारे असे जाहीर करणेत येते की, अर्जदार नं.०१ व ०२ हे मयत कै. श्रीम. शशिकला राजन शिंदे व त्यांचा मुलगा कै. शक्तीसिंह राजन शिंदे यांचे सरळ व कायदेशीर वारस नाहीत असे ज्या कोणास शाबीत करावयाचे असलेस अगर कोणाची तक्रार वा हरकत असलेस त्यांनी आरोग्य विभाग , जिल्हा परिषद कोल्हापूर येथे कार्यालयीन वेळेत दिनांक ०१/१२/२०२२ पर्यंत स्वत: समक्ष हजर राहुन आपले लेखी म्हणणे सादर करावे.

दिनांक : -22/११/२०२२
स्थळ : - जिल्हा परिषद कोल्हापूर.

**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**